# रक्षाबंधन

तुझ्यामाझ्यातले बंध कसे शब्दात सांगावे।
बाळ तुझी माझी एक जोडलेली आईसवे ।।
कधी लटके भांडण कधी लटका रुसवा।
खोड्या सांगताना तुझ्या राग मनात फसवा।।
ठेच लागे पायी तुझ्या डोळा येई माझ्या पाणी।
वेदना ती उरी माझ्या कासावीस होशी मनी।।
बंध आपुल्या नात्याचा जणू नाजुक रेशीम।
गाठ एकदा पडली विलगेना पुन्हा मन।।
राखी आगळी ही तुझ्या मनगटी सजवते।
मूक भावनांना माझ्या शब्दरूपे नटवते।।
ऐल एक पैल एक वाटा वेगळ्या चालतो।
तरी एकरूप मन बंध राखीचा सांगतो।।
तुझ्या माझ्या या नात्याचा कोंब नाजुक हिरवा।
त्याचा सुरेख अंकुर भुईतून उगवावा।।

रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!
सीमा अनिल बरवे.